पुढारी

3 - MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाने जपली सामाजिक बांधिलकी!

## जतमधील दुष्काळग्रस्तांना ५७ क्विंटल धान्य, तीन ट्रक चाऱ्याचे वाटप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

**शिवाजी विद्यापीठाने सामाजिक बांधिलकीची प्रचिती देत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दुष्काळग्रस्त भागातील नागरिक व त्यांच्या जनावरांसाठी सुमारे ५७ क्विंटल धान्य, तीन ट्रक चाऱ्याचे वितरण केले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी दिवसभर प्रशासकीय सहकाऱ्यांसह सांगली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त आटपाडी आणि जत तालुक्यांची पाहणी करण्याबरोबरच चार गावांमध्ये प्रत्यक्ष जाऊन मदतीचे वाटप केले.**

कोणत्याही संकटाच्या या आणीबाणीच्या प्रसंगी शिवाजी विद्यापीठाने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून खारीचा वाटा उचलण्यात नेहमीच पुढाकार घेतला आहे. दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन विद्यापीठाने विद्यार्थी कल्याण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या माध्यमातून संलग्नित महाविद्यालयांना मदतीसाठी आवाहन केले होते. विद्यापीठ परिसरातही गवत व चारा संकलन केले. या माध्यमातून गहू, तांदूळ असे सुमारे ५७ क्विंटल धान्य गोळा झाले. तीन ट्रक चाराही जमा झाला. या मदतीचे शुक्रवारी (दि. २९) कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते चार गावांमध्ये प्रत्यक्ष वाटप करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. डी. के. गायकवाड होते.

जत येथे विद्यापीठाकडून आलेल्या चाऱ्यांच्या ट्रकचे स्वागत विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अभयकुमार साळुंखे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. आर. कारंडे, प्राचार्य डॉ. बी. एन. पवार, राष्ट्रीय सेवा योजना सांगली जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. सदाशिव मोरे, राजे रामराव महाविद्यालय, जत येथील कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र लवटे, डॉ. संगीता पाटील यांच्यासह संबंधित तडवळे, माडगुळे, वज्रवाड, खिलारवाडीचे सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते तडवळे (ता. आटपाडी) येथील ४५० कुटुंबांना सुमारे २२ क्विंटल तांदळाचे वाटप करण्यात आले. माडगुळे (ता. आटपाडी) येथील १०० कुटुंबे आणि त्यांची जनावरे यांच्यासाठी १० क्विंटल धान्य व १० क्विंटल सरकी पेंड देण्यात आली. वज्रवाड (ता. जत) येथील १०० कुटुंबे व त्यांच्या जनावरांसाठी १० क्विंटल धान्य व दोन ट्रक चारा-गवत देण्यात आले. खिलारवाडी (ता. जत) येथील ५० कुटुंबे व त्यांच्या जनावरांसाठी पाच क्विंटल धान्यासह एक ट्रक चारा देण्यात आला.



**कोल्हापूर : जत तालुक्यातील दुष्काळग्रस्तांना मदतीची वाटप करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी कल्याण मंडळ संचालक डॉ. डी. के. गायकवाड.**

# Varsity chips in with drought relief

Shivaji University here has donated three truck loads of fodder for farm animals and about 57 quintals of food grain to drought-affected Aatpadi and Jath taluka in Sangli district. SUK vice-chancellor Devanand Shinde, members of the varsity's student welfare department, and students of the National Service Scheme (NSS) visited Sangli on Friday and were present there all day helping. Officials said the university asked its affiliated colleges to contribute for the social cause.

A university official said that 450 families from Tadawale village near Aatpadi were given around 22 quintals of rice, while 10 quintals of rice was donated to 100 families in Madgule village,

Speaking about the initiative, Shinde said that the varsity has always been upfront about its work in the social sphere. "We are with the people from drought-affected areas will be back with more help whenever the families need us," he said.

He also said that many college professors, students and administrative staff responded to the university's appeal to help drought-hit regions.

"We are overwhelmed by this. We need to acknowledge the support we have got from the colleges and students," said the VC.

Another university official said that students from the NSS unit helped by transporting fodder and grains. TNN

लोकमत 3 - MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात

## शिवाजी विद्यापीठाचा पुढाकार : ५७ क्विंटल धान्य, ३ ट्रक चारा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने सामाजिक बांधीलकीची प्रचिती देताना विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दुष्काळग्रस्त भागातील नागरिक आणि त्यांच्या जनावरांसाठी सुमारे ५७ क्विंटल धान्य आणि तीन ट्रक चाऱ्याचे वितरण केले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त आटपाडी आणि जत तालुक्यांची पाहणी करण्याबरोबरच चार गावांमध्ये प्रत्यक्ष जाऊन मदतीचे वाटप केले.



दुष्काळग्रस्त भागातील बांधवांना थोडा दिलासा देण्याचा शिवाजी विद्यापीठाचा हा प्रयत्न आहे. समाजाचे ऋण फेडण्याची भावना त्यामागे आहे. या कठीणप्रसंगी शिवाजी विद्यापीठ, संलग्नित महाविद्यालये हा सारा परिवार त्यांच्यासोबत असल्याची भावना वृद्धिंगत करण्याबरोबरच सामाजिक नाळ घट्ट करण्याचा आमचा हा प्रयत्न आहे.
-डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु
शिवाजी विद्यापीठ

दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन विद्यापीठाने विद्यार्थी कल्याण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या माध्यमातून संलग्नित महाविद्यालयांना मदतीसाठी आवाहन केले होते. तसेच, विद्यापीठ परिसरातही गवत व चारा संकलन केले होते. या माध्यमातून गहू, तांदूळ आदी सुमारे ५७ क्विंटल धान्य गोळा झाले. तसेच तीन ट्रक चाराही जमा झाला. तडवळे (ता. आटपाडी) येथील ४५० कुटुंबांना सुमारे २२ क्विंटल तांदळाचे वाटप करण्यात आले. माडगुळे (ता. आटपाडी) येथील १०० कुटुंबे आणि त्यांची जनावरे यांच्यासाठी १० क्विंटल धान्य व १० क्विंटल सरकी पेंड देण्यात आली. वज्रवाड (ता. जत) येथील १०० कुटुंबे व त्यांच्या जनावरांसाठी १० क्विंटल धान्य व २ ट्रक चारा-गवत देण्यात आले. खिलारवाडी (ता. जत) येथील ५० कुटुंबे व जनावरांसाठी ५ क्विंटल धान्य, १ ट्रक चारा देण्यात आला.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. डी. के. गायकवाड, प्राचार्य डॉ. एस. आर. कारंडे, प्राचार्य डॉ. बी. एन. पवार, राष्ट्रीय सेवा योजना सांगली जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. सदाशिव मोरे, राजे रामराव महाविद्यालय, जत येथील कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र लवटे, डॉ. संगीता पाटील तसेच तडवळे, माडगुळे, वज्रवाड, खिलारवाडी येथील सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. (प्रतिनिधी)

तरुण भारत

3 - MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाकडून दुष्काळग्रस्तांना धान्य, चारा वाटप

**प्रतिनिधी**
• कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने सामाजिक बांथिलकीची प्रचिती देत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांसाठी सुमारे ५७ क्विंटल धान्य आणि जनवरांसाठी तीन ट्रक चाऱ्याचे वितरण करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आपल्या प्रशासकीय सहकाऱ्यांसह शुक्रवारी दिवसभर आटपाडी आणि जत तालुक्यातील गावांची पाहणी करून, मदतीचे वाटप केले.

विद्यापीठाची सामाजिक बांधीलकी म्हणून विद्यार्थी कल्याण विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या माध्यमातून संलग्नित महाविद्यालयांना मदतीचे आवाहन केले होते. गहू, तांदूळ, चारा यांचे संकलन करण्यात आले. महाविद्यालयांनी संकलीत केलेल्या मदतीचे वाटप शुक्रवारी दिवसभर कुलगुरूंनी स्वतः केले.

त्यांनी आटपाडी येथे ४५० कुटुंबियांची भेट घेत त्यांना २२ क्विंटल तांदळाचे वाटप केले. माडगुळे येथील १०० कुटुंबे आणि त्यांच्या जनावरांसाठी १० क्विंटल धान्य व १० क्विंटल सरकी पेंड देण्यात आली. तसेच २ ट्रक चारा, गवत देण्यात आले. खिलारवाडी (जत) येथील ५० कुटुंबियांसाठी ५ क्विंटल धान्यासह १ ट्रक चारा देण्यात आला.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, प्राचार्य डॉ. एस. आर. कारंडे, प्राचार्य डॉ. बी. एन. पवार, सांगली जिल्हा एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. सदाशिवराव मोरे, डॉ. राजेंद्र लवटे, डॉ. संगीता पाटील, ग्रामपंचायत सरपंच, ग्रामस्थ उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे दुष्काळग्रस्तांना धान्यवाटप करतांना ग्रामस्थांसह कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. के. गायकवाड आदी दिसत आहेत.**

**समाजाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे**

दुष्काळग्रस्त भागातील बांधवांना थोडा दिलासा देण्याचा शिवाजी विद्यापीठाचा हा प्रयत्न आहे. समाजाचे ऋण फेडण्याची भावना त्यामागे आहे. या प्रसंगी शिवाजी विद्यापीठ, संलग्नित महाविद्यालये व सारा परिवार त्यांच्यासोबत असल्याची भावना वृध्दिंगत करण्याबरोबरच सामाजिक नाळ घट्ट करण्याचा आमचा हा छोटासा प्रयत्न आहे, अशी भावना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केली. या उपक्रमासाठी सक्रिय योगदान देणाऱ्या महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी तसेच विविध समाज घटकांचेही कुलगुरूंनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ 3 - MAY 2016



कोल्हापूर : अभियांत्रिकी परीक्षेच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये ग्रामीण गटामध्ये प्रथम क्रमांकाचा पुरस्कार स्वीकारताना केआयटी कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी.

# गुणवत्ता शिष्यवृत्तीत केआयटी अव्वल

कोल्हापूर, ता. २ : अभियांत्रिकी परीक्षेच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये (२०१४-१५) ग्रामीण गटामध्ये केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला. जत येथील राजे रामराव महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमामध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते केआयटी कॉलेजला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी यांनी महाविद्यालयाच्या वतीने सत्कार स्वीकारला. केआयटीला सलग दहाव्या वर्षी हे विजेतेपद मिळाले आहे. या वेळी बीसीयुडी संचालक प्राचार्य डी. आर. मोरे, कुलसचिव व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. महाविद्यालयाच्या ३३ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. सध्या येथे ३ हजार विद्यार्थी विविध शाखांमध्ये शिकत आहेत. संस्थेचे अध्यक्ष सचिन मेनन, उपाध्यक्ष भरत पाटील, सचिव साजिद हुदली यांनी या शिक्षक, विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ 3 - MAY 2016



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीत कला शाखेतून शहरी विभागात न्यू कॉलेजने प्रथम क्रमांक मिळविला. यानिमित्त जत (जि. सांगली) येथील राजे रामराव महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे यांचा गुणवत्ता प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला.